# शिकाऊ उमेदवार (कोपा, विजतंत्री व तारतंत्री) जाहिरात

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित संवसु मंडल, अकोला अंतर्गत संवसु मंडळ कार्यालय, अकोला- **कोपा १३**, शहर विभाग अकोला- **कोपा ०७, विजतंत्री १४, तारतंत्री १४** व अकोट विभाग- **कोपा ०५, विजतंत्री १५, तारतंत्री १५** प्रशिक्षणार्थी **कोपा, विजतंत्री व तारतंत्री** पदे असे एकुण ८३ पदे भरण्याकरित पात्र शिकाऊ उमेदवाराची निवड समितीद्वारे गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. त्याकरीता पात्र शिकाऊ उमेदवारांनी **दि.२०.११.२०२१ चे सायंकाळी ०५:३० वाजेपर्यंत** www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर नोंदणी करुन ऑनलाईन अर्ज करावा. सर्व प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे तसेच कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव बघता तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमावलीनुसार गुणवत्ताधारक (Merit List नुसार) शिकाऊ उमेदवारांचे निवडीबाबतची सुचना उमेदवाराचे नोंदणीकृत मोबाईल क्र. व ईमेल आयडी (E-mail ID) वर पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी. सर्व प्रक्रिया ऑनलाईन असल्याने उमेदवारानी या कार्यालयात येण्याची गरज नाही निवड झालेल्या उमेदवारांना नोंदणीकृत Email Id वर कळविण्यात येईल.

**अटी व शर्ती - १)** शिकाऊ उमेदवारांचे वय किमान १८ वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. २) सदर उमेदवार हा अकोला जिल्हयातील रहिवासी असावा. **२) शैक्षणिक पात्रता : अ)** महाराष्ट्रातील मान्यता प्राप्त (१०+२) व अकोला जिल्हयातील शासनमान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन (कोपा, विजतंत्री तारतंत्री व्यवसाय) मागास प्रवर्गातील (अ.ज. व अ.जा. करिता) उमेदवारांकरिता ५५% गुण व उर्वरित प्रवर्गाकरिता किमान ६०% गुण मिळवुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. **ब)** मागासवर्गीय उमेदवारांची निवड भारतीय शिकाऊ उमेदवार कायदयानुसार करण्यात येईल त्याकरिता उपविभागीय अधिकारी यांचे जाती प्रमाणपत्र आवश्यक राहील. **क)** उमेदवारांने www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. **ड)** कोपा, विजतंत्री, तारतंत्री या संवर्गाचा प्रशिक्षण कालावधी एक वर्षाकरिता राहिल. **इ)** प्रशिक्षण कालावधीत शिकाऊ उमेदवारांना शासकीय नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. **ई)** उमेदवारांची Profile परिपुर्ण असणे आवश्यक आहे तसेच आधारकार्ड व Profile वरील माहिती सारखी असावी सदर अपुर्ण Profile असणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. **उ)** निवड झालेल्या पात्र उमेदवाराने सोबत येतांना आपली सर्व मुळ कागदपत्रे व त्यांची साक्षांकित दोन छायाप्रती सोबत आणावी. **ऊ)** प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेवारांना कंपनीच्या सेवेत सामावुन घेणे बंधनकारक नाही याची नोंद घ्यावी. **ए)** जाहिरातीत बदल किंवा जाहिराती काही भागात अंशत: बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

**अधिक्षक अभियंता संवसु मंडळ,**
**महावितरण, अकोला**

**PRO No. :- 077/2021**